# प्रेसनोट दि.२७/०९/२०१७

## सामाजिक सुरक्षा विभागाकडुन सर्व्हिस अर्पाटमेन्टमध्ये चालु असलेल्या वेश्याव्यवसायावर छापा टाकुन २ पिडीत मुलींची सुटका व ३ आरोपींताना अटक

दि.२६.०९.२०१७ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, यांना एन जी ओ मार्फत माहीती मिळाली की, आर्यन स्टे सर्व्हिस अपार्टमेंट स.नं २५ लोणकर वस्ती केशवनगर मुंढवा पुणे येथे इसमनामे विकी उर्फ विलास उर्फ विकी पाटील हा आपले साथीदार तसेच अर्पाटमेन्ट चालक यांचे सहाय्याने वेगवेगळ्या ठिकाणच्या मुली ठेवुन त्यांचेकडुन वेश्याव्यवसाय करुन घेत आहे.

या अनुषंगाने सामाजिक सुरक्षा विभाग,गुन्हे शाखा पुणे शहर यांचे पथक तसेच मुंढवा पोलीस स्टेशन कडील स्टाफ असे संयुक्त पथकाने नमुद ठिकाणी वेश्याव्यवसाय चालत असले बाबत खातरजमा करुन छापा कारवाई केली. त्याद्वारे तेथुन दोन सज्ञान मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन ३ आरोपी यांना ताब्यात घेण्यात आले. याअनुषंगाने १) विकी ऊर्फ विलास ऊर्फ विकी पाटील २) ऋषी शर्मा ३) राज यादव ऊर्फ गुप्ता ४) नवनाथ बाळासाहेब जठार वय-२८, रा.मु.पो विसापुर, ता.श्रीगोंदा जि.अहमदनगर ५) दिनेश देवेद्र भंडारी वय ३८, धंदा-व्यवसाय रा.स.नं ४१/२ सिध्दीविनायक सोसायटी केशवनगर मुंढवा पुणे ६) राजेंद्र जगन्नाथ शिंदे वय-४०, रा.पवार वस्ती,पवार डेअरी जवळ, केशवनगर मुंढवा पुणे मुळ रा. मु.पो खडकी रावणगाव ता.दौंड जि.पुणे इत्यादी आरोपी यांचे विरुध्द मुंढवा पोलीस स्टेशन येथे गुरनं. २७४/२०१७ इटपा ॲक्ट १९५६ चे क. ३, ४, ५, ६, सह भादंवि कलम ३७०, ३७० अ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास मुंढवा पोलीस स्टेशनकडे सुपुर्त केला आहे. अ.क्र.४ ते ६ या आरोपीतांना घटनास्थळावरुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आले आहे.

**वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.संजय निकम, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री.संजय पाटील, सपोनि चंद्रकांत जाधव, सपोनि शीतल भालेकर, नामदेव शेलार, ननिता येळे, नितिन तेलंगे, गीतांजली जाधव, सचिन कदम, राजेद्र कचरे, रुपाली चांदगुडे, सचिन शिंदे यांनी व मुंढवा पोलीस स्टेशनचे वपोनि श्री.पात्रुडकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.जगताप व स्टाफने केलेली आहे.**